## निशाणी क्रमांक ०५ वरील आदेश

प्रस्तुत प्रकरणामध्ये वादींनी सदरचा अर्ज प्रतिवादींविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाईकरीता दाखल केले आहेत.

**दावा मिळकतीचे वर्णन :–**

०२. मौजे रामतीर, ता. बागलाण, जि. नाशिक येथील मिळकती पुढीलप्रमाणे –

| अ. क्र. | भुमापन क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | चर्तुःसिमा पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. | ६४/अ | १ हे. २२ आर. + पोट खराबा ० हे. ३७ आर. | १ रु. ३७ पै. | गट क्र. ६३ | गट क्र. २१ | गट क्र. १७५ | गट क्र. ६३ पैकी |

(यास येथुन पुढे **दावा मिळकत** असे संबोधण्यात येईल.)

| अ. क्र. | भुमापन क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | चर्तुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ब. | ६३ | १ हे. ५६ आर. | १ रु. ४४ पै. | गट क्र. ६२ | गट क्र. २१ | गट क्र. ६४ | गट क्र. ६४ |
| क. | ६३ | १ हे. ५६ आर. पैकी पश्चिम दिशेकडील ४० आर | | गट क्र. ६३ पैकी | गट क्र. २१ | गट क्र. ६४ | गट क्र. ६४ |

०३. वादी यांची थोडक्यात केस अशी की, दावा मिळकत ही वादीच्या मालकी व कब्जेउपभोगातील मिळकत असुन वादीचे दावा मिळकतीचे पुर्व बाजुस प्रतिवादी क्र. १ व २ याचे गट क्र. ६३ ही मिळकत असुन सदर मिळकतीचे मुळ क्षेत्र २ एकर आहे. तरी देखील प्रतिवादी क्र. १ व २ हे त्यांचा अधिकार वादीचे दावा मिळकतीच्या क्षेत्रावर दर्शविण्याच्या उद्देशाने प्रतिवादी यांनी त्यांच्या मिळकतीची मोजणी करुन, वादीने त्यांचे क्षेत्रात अतिक्रमण केले असल्याचे दर्शविल्याने, वादी व प्रतिवादी यांच्यात प्रस्तुत वाद उपस्थित झालेला आहे. प्रतिवादी क्र. ३ व ४ हे प्रतिवादी क्र. १ व २ चे मुले असुन प्रतिवादी क्र. ५ हा वादीचा

मोठाभाऊ आहे. सर्व प्रतिवादी हे वादीची दावा मिळकत मध्ये अतिक्रमण करुन कब्जा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. मुळतः गट क्र. ३०५ चे रुपांतर होऊन गट क्र. ६३ मध्ये झालेला आहे, तर गट क्र. ६६ चे रूपांतर दावा मिळकत गट क्र. ६४ मध्ये झालेले आहे. दावा मिळकत ही वादीची वडिलोपार्जीत मिळकत असुन स.नं. ४८, ११४/४, ११४/३, ११४/१ यांचे एकत्रीकरण होऊन गट क्र. ६६ झाला असुन तो वादीचे वडिल जिभाऊ अहिरे यांच्या नांवे झाला होता. सन १९८७ साली वादी व त्याचे भाऊ यांच्यात वाटप होऊन दावा मिळकत ही वादीचे वाटणीस आलेली आहे.

०४. वादीचे कथनानुसार, जुना स.नं. ११४ हा प्र.वादी व त्याचे कुटूबियांचे मालकीचा होता व सन १९५९ साली त्यात वाटप होऊन स.नं. ११४/१/अ/३ चे क्षेत्र २ एकर ही मिळकत भिका दगा पाटील यांच्या वाटणीस आली. त्यानंतर सदर मिळकत भिका दगा पाटील यांनी मुरलीधर अहिरे यांना दि. ०८.०५.१९६८ रोजी खरेदीखताने दिली असून स.नं. ११४/१/अ/३ (११४/५) चे एकत्रीकरण योजने अंतर्गत रुपांतर गट क्र. ३०५ मध्ये झाले. परंतू सदर योजनेत मुरलीधर ग्यानदेव अहिरे यांचे नांवे २ एकर क्षेत्राऐवजी ३ एकर ३४ गुंठे हस्तदोषाने एकत्रीकरण योजनेत झालेले आहे. पुढे जुना गट नं. ३०५ चे रुपांतर रामतीर येथील गट क्र. ६३ मध्ये झाले आहे. सदर एकत्रीकरण योजनेत गट क्र. ६३ वर १ एकर ३४ गुंठे क्षेत्राची अतिरिक्त नोंद झालेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या ताब्यात देखील पुर्वीपासुन २ एकर क्षेत्र आहे. पुर्वापार वादी व प्रतिवादी यांच्या मिळकतीमध्ये पुर्वापार सामाईक बांध असुन त्या स्थितीप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या कब्जात मिळकती आहेत. अशी परिस्थिती असताना देखील, प्रतिवादी यांनी दि. ०४.०१.२०२१ रोजी भुमि अभिलेख सटाणा येथे मोजणी अर्ज दाखल करुन मो.र.नं. २७७९/२०२१ अन्वये वादीनी प्रतिवादींचे गट क्र. ६३ वर ४० आर क्षेत्र अतिक्रमण केल्याचे दर्शवुन मोजणी नकाशा तयार केला. प्रतिवादी यांनी उपविभागीय अधिकारी यांचे न्यायालयात अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी प्रकरण दाखल केले असता सदर मोजणी नकाशावर विसंबुन राहुन दि. १३.०२.२०२३ रोजी प्रतिवादीचा अर्ज मंजुर करुन वादीच्या दावा मिळकत मधील क्षेत्राचे बेकायदेशीरित्या कब्जा घेण्याचे तयारीत प्र.वादी आहेत. प्रतिवादीनी महसुल अधिकारी यांच्या चुकीच्या मोजणी नकाशा व न्यायनिर्णयाआधारे कब्जा घेतला, तर वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान

होईल. त्यामुळे वादीने तुर्तातुर्त ताकीदीसाठी सदरचा दावा दाखल केलेला आहे.

०५. सदर दाव्याचा अंतिम निर्णय हा वादीचे लाभात होईल अशी वादीस खात्री आहे. तसेच प्रथम दर्शनी कसे वादीचे लाभात असुन न्यायाचे झुकते माप देखील वादीचे लाभात आहे. परंतु सदर अंतिम निकाल लागण्यांस बराच कालावधी लागणार आहे. मात्र प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील पिकांचे नुकसान केल्यास, वादी कुटूंबियास उपासमारीला तोंड द्यावे लागेल, परिणामी वादींचे अपरिमीत असे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. त्यामुळे शेवटी वादीने अशी विनंती केली की, प्रतिवादींनी मो.र.न. २७७९/२०२१ व अतिक्रमण केस क्र. ४/२०२२ चे आदेशास अनुसुरुन दावा मिळकत उपभोगास हरकत, अडथळा येईल असे कोणतेही कृत्य प्रतिवादी अथवा त्यांचे वतीने त्यांचे नातेवाईक, गडीमाणसे, नोक–चाकर, एजंट, मुखत्यार यांचेमार्फत करु नये तसेच बेकायदेशीररित्या दावा मिळकतीचा कब्जा घेऊ नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश होणेबाबत विनंती केली आहे.

०६. प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी निशाणी क्र.२० वर म्हणणे सादर करुन सदरचा अर्ज पुर्णपणे खोटा व चुकीचा असल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, गट नं. ६३ क्षेत्र १ हे. ५६ आर ही मिळकत भगवान अहिरे यांची होती. प्रतिवादी क्र. १ ची आई नामे सुभाबाई यांनी दि. १५.०५.२००० रोजी सदर मिळकत भगवान अहिरे यांच्याकडुन खरेदीखताने विक्री घेतलेली आहे. सदर गट क्र. ६३ चे क्षेत्रापैकी प्रतिवादी क्र. १ पंढरीनाथ यांचे वाटपास ७८ आर व सुरेखा पंढरीनाथ यांच्या वाटपास ७८ आर देण्यात आले. सन २०१० पासुन सदर मिळकत ही प्रतिवादी यांच्या कब्जात आहे. गट नं. ६३ चे क्षेत्र १ हे ५६ आर असुन ते कमी असल्याचे प्रतिवादीना वाटत असल्याने, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी उपअधिक्षक भुमि अभिलेख सटाणा यांच्याकडे मोजणी अर्ज केला. त्यानुसार मो.र.नं. २७७९/२०२१ अन्वये भुकर मापक यांनी दि. १७.०६.२०२१ रोजी मोजणी करुन नकाशा तयार केला. सदर मोजणीमध्ये गट नं. ६३ चे ४० आर क्षेत्र दावा मिळकत गट नं. ६४/३ चे मालकांनी म्हणजेच वादीने अतिक्रमण केले असल्याचे निष्पन्न झाले. वादी सदर अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा देत नसल्याने प्रतिवादी यांनी उपविभागीय अधिकारी याच्याकडे अतिक्रमण केस क्र. ४/२०२२ दाखल करुन ४० आर क्षेत्राचा कब्जाची मागणी केली व सदर केसमध्ये दि.

१३.०२.२०२३ रोजी निकाल देऊन वादीने ४० आर क्षेत्राचा कब्जा प्रतिवादींना द्यावा असा आदेश प्रतिवादींचे लाभात करण्यात आलेला आहे. सदर अतिक्रमीत क्षेत्र प्रतिवादीना देऊ लागु नये म्हणुन वादीने प्रस्तुत खोटा दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

०७. अर्ज, म्हणणे, प्रकरणातील कागदपत्रे आणि दोन्ही बाजुंच्या विधिज्ञांचा लेखी युक्तीवाद यावरुन पुढील मुद्दे माझ्या विचारार्थ निघतात. त्यांना मी माझी कारणांसहित उत्तरे यापुढे नमूद करीत आहे.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. वादी प्रथमदर्शनी केस सिध्द करतात काय ? | : | **होकारार्थी.** |
| २. सोईस्करतेची तुला वादींच्या बाजुने आहे असे ते सिध्द करतात का ? | : | **होकारार्थी.** |
| ३. मागणी केलेप्रमाणे तुर्तातुर्त मनाई न दिलेस वादींचे अपरिमित नुकसान होणार आहे. असे वादी सिध्द करतात काय ? | : | **होकारार्थी.** |
| ४. काय आदेश ? | : | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

०८. वादी व प्रतिवादी यांनी अर्जाचे पुष्ठयार्थ दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केल व त्याचा योग्य ठिकाणी उल्लेख केलेला आहे.

**मुद्दा क्रमांक १ ते ४ च्या अनुषंगाने :**

०९. सदरचे चारही मुद्दे एकमेकांशी सल्लग्न असलेने पुनरावृत्ती टाळणेसाठी मी ते एकत्रीत विचारात घेत आहे.

१०. वादीतर्फे विधीज्ञांनी एकत्रीकरण योजनेमध्ये प्रतिवादींच्या नावावर हस्त दोषामुळे जास्त क्षेत्राची नोंद झालेली आहे व त्याचा गैरफायदा घेऊन अतिरिक्त क्षेत्र कब्जात

मिळावे यासाठी प्रथमतः प्रतिवादीने त्यांचे मिळकतीची बेकायदेशीर मोजणी करुन त्यामध्ये वादीने अतिक्रमण केल्याचे भासवुन अतिक्रमण केस ४/२०२२ चा आदेश प्राप्त केलेला असल्याचा युक्तीवाद केला. याउलट प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी ते महसुल सदरी असलेल्या क्षेत्राचे मालक असल्याने त्यांचा कायदेशीर असल्याचे व वादीनेच त्यांचे क्षेत्रात अतिक्रमण केल्याने वादीचा अर्ज नामंजुर करण्यात यावा असा युक्तीवाद करण्यात आलेला आहे.

११. अभिलेखावरील निशाणी ३/१२ अतिक्रमण केस ४/२०२२ चे निकालाचे अवलोकन केले असता दि. १३.०२.२०२३ रोजी दिला असल्याचे व त्यानंतर वादीने लगेचच दि. १६.०३.२०२३ रोजी प्रस्तुतचा दावा दाखल केल्याचे दिसते. त्यामुळे सकृतदर्शनी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम कलम १३८ नुसार वादीचा दावा हा मुदतीत आहे.

१२. वादीचे कथनानुसार प्रतिवादींचे नावावर एकत्रीकरण योजनेत ज्यादा क्षेत्राची नोंद झालेली असल्याने व प्रतिवादी हे केवळ २ एकर क्षेत्राचे मालक असल्याचे घोषीत होऊन मिळण्याची मागणी वादीने केलेली आहे. त्याचे पुष्ठयार्थ वादीने दाखल केलेल्या निशाणी ३/४ वरील फेरफार नोंद क्र. १ चे अवलोकन केले असता रातीर गावाचे विभाजन होऊन रातीर व रामतीर असे दोन गांव रुपांतर झाले असल्याचे व दावा मिळकतीचा जुना गट नं. ६६ असल्याचे व प्रतिवादींची मिळकत ६३ याचा जुना गट नं. ३०५ असल्याचे सकृतदर्शनी दिसते. तसेच वादीने दाखल केलेल्या निशाणी ३/६ वरील फेरफार नोंद क्र. ५९१ चे अवलोकन केले असता भिका दगा पाटील, लखा दगा पाटील व सुकदेव दगा पाटील सन १९५९ मध्ये आपआपसात वाटप केल्याचे व त्यानुसार भिका दगा पाटील यांना २ एकर क्षेत्र वाटणीस आल्याचे व त्याचा सर्व्हे नं. ११४/१अ/३ असल्याचे दिसते. त्यानंतर दाखल केलेल्या निशाणी ३/७ वरील फेरफार नोंद क्र. ७६२ चे अवलोकन केले असता भिका दगा अहिरे यांनी त्यांचे २ एकर क्षेत्र मुरलीधर ग्यानदेव आहिरे यांना दि. १४.१०.१९६८ रोजी विक्री केल्याचे दिसते. तसेच एकत्रीकरण योजनेमध्ये मुरलीधर ग्यानदेव यांचे सर्व्हे नं. ११४ चे गट नं. ३०५ मध्ये रुपांतर झाल्याचे देखील निशाणी ३/८ वरील एकत्रीकरण उता–यावरुन दिसते व सदर एकत्रीकरणामध्ये मुरलीधर ग्यानदेव यांच्या नांवे ३ एकर ३४ आर क्षेत्राची नोंद झाल्याचे दिसते. याउलट प्रतिवादीने देखील निशाणी २५/२ वर गट क्र. ६३ चा ७/१२ उतारा

दाखल केलेला आहे. त्यामध्ये मुरलीधर ग्यानदेव आहिरे यांचे नांव कमी करुन भगवान नथु अहिरे यांचे नांव लागल्याचे व त्यामध्ये देखील १ हे. ५६ आर क्षेत्र नमुद झाल्याचे प्रतिवादीने कथन केलेले आहे. परंतु सकृतदर्शनी उपरोक्त फेरफार नोंद क्र. ५९१ नुसार भिका दगा पाटील यांना २ एकर क्षेत्र वाटणीस आल्याचे व त्यांनी ते क्षेत्र फेरफार नोंद क्र. ७६२ अन्वये मुरलीधर ग्यानदेव आहिरे यांना दि. १४.१०.१९६८ रोजी विक्री केल्याचे दिसते. म्हणजेच सकृतदर्शनी भिका दगा याचे नांवावरच ३ एकर ३४ आर क्षेत्र नसल्याचे व त्याचेवर नांवावर केवळ २ एकर क्षेत्र असल्याचे व ते त्याने मुरलीधर ग्यानदेव आहिरे यांना विक्री केल्याचे दिसते. परंतु एकत्रीकरण योजनेत त्यांचे नांवावर ३ एकर ३४ आर क्षेत्र नोंद झाल्याचे दिसते. त्यामुळे सकृतदर्शनी वादी कथन करतात त्याप्रमाणे एकत्रीकरण योजनेत हस्तदोष झाल्याचे कथनात तथ्य वाटते व मुळ पुरुष भिका धना याचेच नावावर ३ एकर ३४ क्षेत्र नसुन केवळ २ एकर क्षेत्र असल्याचे कथनात तथ्य वाटते. तसेच २ एकर पेक्षा उर्वरीत क्षेत्र प्रतिवादीचे नांवावर कसे आहे याबाबतचे स्पष्टीकरण सकृतदर्शनी प्रतिवादीने दिलेले नाही.

१३. सकृतदर्शनी अतिक्रमण केस ४/२०२२ झालेली मोजणी ही प्रतिवादीचे महसुल सदरी नमुद असलेल्या क्षेत्रानुसार झाल्याचे दिसते व उपरोक्त चर्चेनुसार वादीने प्रतिवादीचे महसुल सदरी एकत्रीकरणात क्षेत्र चुकीचे नमुद असल्याचे व याउलट प्रतिवादी केवळ २ एकर क्षेत्राचे मालक असल्याचे सकृतदर्शनी सिध्द केलेले आहे व वादीची अंतिम मागणी देखील तीच आहे.

१४. त्यामुळे,माझ्या मते वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केलेली आहे. तसेच जर अतिक्रमण केस ४/२०२२ नुसार वादीचे क्षेत्रातुन अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा प्रतिवादीना दिल्यास वादींचे अपरिमीत नुकसान देखील होणार आहे. त्यामुळे सोयीस्करतेचा तुला व अपरिमीत नुकसानीचे तत्व हे देखील त्यांच्या बाजुने आहे. त्यामुळे मागणी प्रमाणे तुर्तातुर्त मनाई आदेश मिळण्यास सकृतदर्शनी वादी पात्र असल्याचे दिसते. सबब मी मुद्या क्र. १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

१५. सबब, उपरोक्त चर्चेनुसार तसेच कायद्यातील तरतुदीनुसार आणि वर नमुद कारणांकरिता मी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर नकारार्थी नोंदवत आहे. व मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ

पुढील आदेश पारित करत आहे.

## <u>आदेश</u>

०१. वादीचा अर्ज (निशाण क्र. ०५) **मंजूर** करणेत येत आहे.

०२. दाव्याच्या अंतिम निकालापावेतो प्रतिवादींनी मो.र.न. २७७९/२०२१ व अतिक्रमण केस क्र. ४/२०२२ चे आदेशास अनुसरुन दावा मिळकत उपभोगास हरकत, अडथळा येईल असे कोणतेही कृत्य प्रतिवादी अथवा त्यांचे वतीने त्यांचे नातेवाईक, गडीमाणसे, नोक–चाकर, एजंट, मुखत्यार यांचेमार्फत करु नये तसेच बेकायदेशीररित्या दावा मिळकतीचा कब्जा घेऊ नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देणेत येत आहे.

स्थळ : सटाणा. ( **अ. सु. कोष्टी** )
दिनांक : १८.०१.२०२४. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सटाणा.